# बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

# कार्यकारी सारांश

**बहुवर्षीय वीजदर चौकटी अंतर्गत आर्थिक वर्ष २००७-०८ करिता वार्षिक कामगिरी पुनर्विलोकन, आर्थिक वर्ष २००६-२००७ मधील खर्चाचे अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २००८-२००९ करिता वार्षिक महसुली आवश्यकता आणि वीजदर निर्धारणासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे बेस्ट उपक्रमाने सादर केलेली याचिका**

# कार्यकारी सारांश

## प्रस्तावना:

बेस्ट उपक्रमाकडून मुंबई बेट शहरामधील वीजग्राहकांना १०० वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून कार्यक्षमतेने आणि विश्वासार्हतेने विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. तत्कालीन बॉम्बे इलेक्ट्रीक सप्लाय आणि ट्रामवेज कंपनी यांनी १९०५ या वर्षापासून शहरामध्ये विद्युत पुरवठा करण्यास सुरुवात केली. १९२६ या वर्षापर्यंत सदर कंपनी त्यांच्या वीजग्रहकांना वीज वितरण करण्याकरिता स्वतः विद्युत निर्मिती करीत होती. त्यानंतर, टाटा इलेक्ट्रीक कंपनी यांनी बेस्ट उपक्रमाला विद्युत पुरवठा करण्यास सुरुवात केली. १९४७ या वर्षामध्ये महानगरपालिकेने सदर कंपनी (म्हणजे, बॉम्बे इलेक्ट्रीक सप्लाय आणि ट्रामवेज कंपनी) आपल्या ताब्यात घेतली.

वीज पुरवठयामध्ये कमीत-कमी व्यत्यय आणि योग्य व्होल्टता तसेच वाजवी दराने विद्युत पुरवठा करण्याकरिता बेस्ट उपक्रम भारतामध्ये प्रसिध्द आहे. तसेच, विद्युत पुरवठा वितरण प्रणालीमधील निर्माण झालेल्या कोणत्याही बिघाडाच्या बाबतीमध्ये विद्युत पुरवठा त्वरित पुर्ववत करण्याकरिता सुध्दा बेस्ट उपक्रमाची ख्याती आहे. मागील ६० वर्षांच्या कालावधीमध्ये विद्युत उपकेंद्राच्या संख्येमध्ये २४७ वरुन १९८१ एवढी वाढ झाली आहे. तसेच, भूमिगत तारखंडाच्या लांबीमध्ये १२६३ कि.मीटर्सवरुन ९,२८७ कि.मीटर्स एवढी, मार्गप्रकाश दिव्यांमधआये २,२१५ पासून ४०,२८१ एवढी आणि वीजग्राहकांच्या संख्येमध्ये सुमारे १ लाखावरुन ९.३८ लाख एवढी वाढ झाली आहे.

## पूर्वपिठीका :

## बेस्ट उपक्रमाच्या कामगिरीवर एक दृष्टिक्षेप

मुंबई शहराला देशाच्या आर्थिक राजधानीचा दर्जा देण्यात आला आहे. त्यापैकी बेस्टच्या पुरवठयाच्या परवाना क्षेत्राला आर्थिक जिल्हयाचा दर्जा देण्यात आला आहे. आर्थिक केंद्राचे कार्य परिणामकारकरित्या चालण्यासाठी, सर्व ग्राहकांना उत्तम दर्जाचा व विश्वसनीय पुरवठा करण्याचे बेस्टपुढे परवाने वितरणधारक म्हणून अत्यंत आवाहनात्मक काम आहे.

वितरण जालव्युह सुस्थितीत ठेवल्यामुळे उच्च प्रतीचा वीज पुरवठा वितरण परवाना क्षेत्रात सुरु ठेवणे शक्य झाले आहे. ज्यायोगे सुरळीत वीज पुरवठयाची साध्य केलेली विश्वासार्हता संपूर्ण देशात सर्वोत्तम आहे. खालील तक्ता वित्तीय वर्ष २००६-०७ मधील बेस्ट उपक्रमाचे विश्वासार्हतेचे निर्देशांक दर्शवितो. मुंबई शहराला वीज पुरवठा करण्याचे एक आव्हान असून सुध्दा हे निर्देशांक बेस्ट उपक्रम त्यांचे जालव्यूह सर्वोत्तम कामगिरीचे द्योतक असल्याचे दर्शवितात.

| महिना | आर्थिक वर्ष २००६-०७ | | |
|---|---|---|---|
| | प्रणालीचा सरासरी व्यत्यय कालनिर्देशांक SAIDI (मिनिटांमध्ये) | प्रणालीचा सरासरी व्यत्यय वारंवारतेचा निर्देशांक (SAIFI) | ग्राहकांचा सरासरी व्यत्यय कालनिर्देशांक CAIDI (मिनिटांमध्ये) |
| एप्रिल, २००६ | १७.६३ | ०.३८ | ४६.४० |
| मे, २००६ | १३.८५ | ०.३५ | ३८.३५ |
| जून, २००६ | २१.०९ | ०.५१ | ४१.२९ |
| जुलै, २००६ | २७.५० | ०.६२ | ४४.१७ |
| ऑगस्ट, २००६ | २१.७४ | ०.५७ | ३८.०४ |
| सप्टेंबर, २००६ | १७.४० | ०.४५ | ३८.५४ |
| ऑक्टोंबर, २००६ | १४.८४ | ०.३६ | ४०.८४ |
| नोव्हेंबर, २००६ | १३.६८ | ०.३१ | ४३.६४ |
| डिसेंबर, २००६ | १३.३० | ०.३२ | ४१.५८ |
| जानेवारी, २००७ | ११.५१ | ०.२९ | ३९.४८ |
| फेब्रुवारी, २००७ | १०.०४ | ०.२५ | ३९.६५ |
| मार्च, २००७ | १४.६६ | ०.३३ | ४४.०७ |

बेस्ट मा. आयोगास कळवू इच्छितो की, ग्राहकांच्या सेवेत सुधारणा करण्याच्या बेस्टच्या अथक दृष्टिकोनातून मागील काही वर्षात बेस्टने ग्राहक सेवेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजनांची अंमलबजावणी केली आहे.

- आर्थिक आणि प्रवर्तनात्मक घटकांमध्ये तसेच ग्राहक सेवेमध्ये चांगली सुधारणा होण्याकरिता मा. आयोगाच्या निर्देशानुसार दि. १ एप्रिल, २००७ पासून बेस्ट उपक्रमाने सर्व वीजग्राहकांना मासिक देयक आकारणीची अंमलबजावणी उत्तम प्रकारे सुरु केली आहे.

- मासिक देयक आकारणीमुळे वीजदेयके जमा करण्यासाठी वाढीव मागणीच्या अनुषंगाने अतिरिक्त ४२ वीजदेयक भरणा केंद्रे दि. १ एप्रिल, २००७ रोजी सुरु करण्यात आली. तसेच चालू असलेल्या वीजदेयक भरणा केंद्रांचा कालावधी दुपारी २.०० वाजल्यापासून संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत वाढविण्यात आला आहे.

- इलेक्ट्रिक हाऊस येथे स्वयंचलित धनादेश स्विकारण्याची यंत्रणा सुरु केली. ज्यायोगे वीजग्राहक कधीही २४ तास वीजदेयके भरु शकतात.

- अधिक ग्राहकाभिमुख होण्यासाठी आणि तसेच वाणिज्यिक हानी कमी करण्यासाठी, बेस्टने उत्तर मुंबईतील झोपडपट्टी भागातील वीजग्राहकांची गरज भागविण्यासाठी स्वतंत्र प्रवर्तन व देखभाल विभाग सुरु केला आहे.

- वित्तीय वर्ष २००७-०८ मध्ये बेस्टने वीजचोरीवर कडक उपाययोजना राबविल्यामुळे अपराधी ग्राहकांकडून वसूल करण्यात आलेल्या रक्कमेत वाढ झाली आहे. वित्तीय वर्ष २००५-०६ मध्ये बेस्ट उपक्रमाने ४५७ प्रकरणांमध्ये एकूण रु. ४८६.४ लाख इतकी वसूली केली होती. वित्तीय वर्ष २००६-०७ मध्ये ६५८ प्रकरणांमध्ये बेस्टने रु. ९६७.५६ लाख इतकी वसूली केली होती. या तुलनेत बेस्ट उपक्रमाने वित्तीय वर्ष २००७-०८ मधील नोव्हेंबर महिन्याच्या अंती १९१८ प्रकरणांमध्ये एकूण रु. ११८२.३२ लाख इतकी वसूली केली आहे.

- वाढत्या ऊर्जेची मागणी पूर्ण करण्याकरिता आणि बाहय स्त्रोतांकडून महाग ऊर्जा खरेदीसाठी अवलंबित्व कमी करण्याकरिता बेस्ट उपक्रमाने टीपीसी(जी) समवेत त्यांच्या ऊर्जा निर्मिती क्षमतेच्या ८०० एमडब्ल्यू इतकी ऊर्जा मिळण्यासाठी ऊर्जा खरेदी करार केला आहे.

## बहुवार्षिक वीजदर (एमवायटी) प्रणाली तत्त्वानुसार सादर करण्यात आलेली माहिती

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने एमईआरसी (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ अंमलात आणला आहे. सदर विनियम राज्यामधील सर्व विद्युत पुरवठा वितरण परवानेधारकांना लागू आहे. ह्या विनियमानुसार, विद्युत पुरवठा उपयोगिता संस्थांना २००७-२००८ या चालू वित्तीय वर्षाकरिता वार्षिक कामगिरी आढावा (एपीआर) आणि २००८-०९ या आगामी वित्तीय वर्षाकरिता सुधारित एकूण महसुली आवश्यकता (एआरआर) याचिका दाखल करणे आवश्यक असून यामुळे २००८-०९ या वित्तीय वर्षाकरिताच्या ऊर्जेच्या किरकोळ विक्रीकरिताची आकारणी निश्चित करण्याकरिता आधारभूत होईल.

विद्यमान याचिकेमध्ये, दिनांक २७ ऑगस्ट च्या अपील न्यायाधिकरण (विद्युत) च्या आदेशाच्या अनुषंगाने उपस्थित झालेल्या २००४-०५ आणि २००५-०६ या वित्तीय वर्षाकरिताच्या प्रत्यक्ष खर्चाचे समायोजन, आणि २००६-०७ या वित्तीय वर्षाकरिताच्या खर्चाच्या प्रत्यक्ष समायोजनकरिता, तसेच, २००७-०८ या वर्षाकरिताच्या वार्षिक कामगिरी पुनर्विलोकनाच्या (एपीआर) मान्यतेकरिता आणि २००८-०९ या वर्षाकरिताच्या सुधारित वार्षिक महसुली आवश्यतेकरिता बेस्ट उपक्रमाने सन्माननीय आयोगाकडे विनंती केली आहे.

## मागणी अंदाज :

नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षाकरिता बहुवार्षिक वीजदर याचिकेमध्ये, यापूर्वीच्या वीजग्राहक आणि विक्रीमधील वाढीच्या कलानुसार बेस्ट उपक्रमाने २००७-०८ या वित्तीय वर्षाकरिता ३८५०.७५ एमयू (दशलक्ष युनिट) एवढी ऊर्जेच्या विक्रीचा अंदाज केला होता आणि २००७-०८ या वित्तीय वर्षाच्या पहिल्या सहा महिन्याकरिता १९८४ एमयू विक्री अंदाजित करण्यात आली होती. तथापि, एप्रिल, २००७ ते सप्टेंबर, २००७ या कालावधीमध्ये प्रत्यक्ष विक्री २१८४.९८ एमयू एवढी नोंदविण्यात आली असून ही वाढ चालू वर्षामधील ऊर्जा मागणीमध्ये अपेक्षेपेक्षा मोठया प्रमाणामध्ये उच्चतर (१०.१५ टक्के) स्वरुपाची आहे. म्हणून, बेस्ट उपक्रमाकडून चालू वर्षाच्या ऊर्वरित महिन्याकरिता सुधारित विक्रीचे अंदाज चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यामधील प्रत्यक्ष विक्रीतील वाढ विचारात घेऊन अंदाजित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

ह्या प्रयोजनार्थ बेस्ट उपक्रमाकडून करण्यात आलेल्या एकूण वार्षिक विद्युत ऊर्जा खरेदीच्या तुलनेत सरासरी मासिक विद्युत ऊर्जा खरेदीची ५ वर्षाच्या सरासरी आधारावर विक्री अंदाजित करण्यात आली आहे. सुधारित अंदाजामध्ये वर्षाच्या शेवटी विक्री ४१५२ एमयू असेल जी २००६-०७ या वित्तीय वर्षामधील प्रत्यक्ष नोंदीपेक्षा ९.३ टक्क्यांनी अधिक आहे.

बेस्ट उपक्रमाने २००८-०९ या वित्तीय वर्षाची विक्री अंदाजित करताना, सन्माननीय आयोगाकडून देण्यात आलेल्या निदेशानुसार उपक्रमाने हाती घेतलेल्या अंदाजित विद्युत भार अभ्यासावरुन विद्युत ऊर्जा विक्रीमधील एकंदरीत वाढ विचारात घेतली आहे. तसेच, बेस्ट उपक्रमाच्या परवाना क्षेत्रामधील गिरण्याच्या जमीनीचा मोठया प्रमाणामध्ये पुनर्विकास झाला असून, २००८-०९ या वित्तीय वर्षापासून वीजेची अधिक मागणी अपेक्षित आहे. अशा प्रकारच्या विकासामुळे बेस्ट उपक्रमाला करण्यात आलेल्या मोठया प्रमाणामधील वीज भाराकरिताच्या विनंतीनुसार, २००८-०९ या वित्तीय वर्षामध्ये बेस्ट उपक्रमाच्या जालव्युहामध्ये सुमारे ५२ एमडब्ल्यू एवढया अतिरिक्त वीज पुरवठयामध्ये मागणी वाढण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे वीज भार टप्प्या-टप्प्याने वाढण्याचे संभावित असल्यामुळे, २००८-०९ या वित्तीय वर्षापासून २० टक्के वार्षिक भार घटक विचारता घेण्यात आला आहे. प्रस्तुत आधारावर बेस्ट उपक्रमाने २००७-०८ आणि २००८-०९ या वित्तीय वर्षाकरिता विद्युत ऊर्जा विक्रीचा अनुक्रमे ४१५२ एमयू आणि ४३४० एमयू एवढा सुधारित अंदाज केला आहे.

## वितरण हानी :

बेस्ट उपकमाने जालव्युहामध्ये श्रेणीवाढ करुन आणि कार्यक्षम प्रवर्तनिय प्रथा स्वीकारुन निम्न वितरण हानी साध्य केली आहे. उपकमाचे संपूर्ण विद्युत पुरवठा वितरण जालव्यूह भूमिगत तारखंडामार्फत असल्यामुळे हानीची पातळी निम्नतर आहे. बेस्टच्या परवाना क्षेत्रामध्ये चोरीचे प्रकार आणि वीजमापकातील अनधिकृत बदलाचे प्रमाण कमी आहे. २००६-०७ या वित्तीय वर्षाकरिता ११.५० टक्के एवढी मान्य केलेल्या हानीऐवजी प्रत्यक्ष वितरण हानी ११.४८ टक्के एवढी आहे.

बेस्ट उपक्रमाने २००७-०८ या वित्तीय वर्षामध्ये विद्युत पुरवठा वितरणातील हानी निम्नतर पातळीवर राखण्याचे पुढे चालू ठेवले आहे. दिनांक १ एप्रिल २००७ पासून सर्व प्रवर्गातील वीजग्राहकांकरिता मासिक देयकाची अंमलबजावणी करुनसुध्दा बेस्ट उपकमाने या वर्षामध्ये वाणिज्य हानी कमी करण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणामध्ये उपक्रम हाती घेतला आहे.

२००७-०८ या वित्तीय वर्षामध्ये पहिल्या अर्ध वार्षिक प्रत्यक्षाच्या आधारे, प्रस्तुत वर्षाच्या उर्वरित महिन्याकरिताच्या विक्रीच्या अंदाजावर, २००७-०८ या संपूर्ण वित्तीय वर्षाकरिताची अंदाजित वितरण हानी पुढे दर्शविण्यात आली आहे. २००८-०९ या वित्तीय वर्षाकरिता आयोगाने मान्य केलेल्या १०.५ टक्के एवढी निश्चित केलेली हानीची पातळी राखण्याकरिता बेस्ट उपक्रमाकडून प्रयत्न करण्यात येतील.

## २००७-०८ ते २००८-०९ या वित्तीय वर्षाकरिता अंदाजित वितरण हानी

| वर्ष | टी ॲण्ड डी इन्टरफेस येथे ऊर्जेची आवश्यकता (एमयू) | विद्युत ऊर्जा विक्री (एमयू)* | वितरण हानी (टक्केवारी) | मान्यताप्राप्त वितरण हानी (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| वित्तीय वर्ष २००७-०८ | ४५४७ | ४०६८ | १०.५४% | ११.०% |
| वित्तीय वर्ष २००८-०९ | ४८४९ | ४३४० | १०.५% | १०.५% |

* समायोजित.

वरील परिगणनेमध्ये, २००७-२००८ या वित्तीय वर्षाकरिताचे विक्री अंदाज ८४.३ एमयूने समायोजित केले आहेत. याचे कारण पुढीलप्रमाणे आहे. दिनांक १ एप्रिल २००७ पासून विशिष्ट प्रवर्गाकरिताची देयके आकारणी द्वैमासिक वरुन मासिक आकारणीमध्ये करण्यात आल्यामुळे मार्च महिन्यामध्ये देय असलेले काही एमयू एप्रिल महिन्यामध्ये दर्शविण्यात आल्यामुळे त्या महिन्यामध्ये अधिक विक्री (त्या महिन्यामध्ये करण्यात आलेल्या ऊर्जा खरेदीपेक्षा अधिक) आकडेवारी दर्शविण्यात आली. बेस्ट उपक्रमाने सदर अतिरिक्त देयक आकारणी ८४.३ एमयू एवढी अंदाजित केली असून आता दुरुस्त करण्यात आली आहे.

एकूण ऊर्जा संतुलन खाली दिल्याप्रमाणे आहे.

वित्तीय वर्ष २००६-०७, २००७-०८ आणि २००८-०९ करिता ऊर्जा संतुलन खालीलप्रमाणे :-

| तपशील | वित्तीय वर्ष २००६-०७ | वित्तीय वर्ष २००७-०८ | वित्तीय वर्ष २००८-०९ |
|---|---|---|---|
| ऊर्जेची मागणी (एमयू) | ३८०० | ४०६८ | ४३४० |
| वितरण हानी (%) | ११.४८% | १०.५४% | १०.५% |
| ऊर्जा आवश्यकता (एमयू) | ४२९३* | ४५४७ | ४८४९ |
| पारेषण हानी (%) | -- | ४.५८% | ४.८५% |
| एकूण ऊर्जा खरेदी | ४४०८* | ४७६५ | ५०९७ |

* आर्थिक वर्ष २००६-०७ च्या पहिल्या सहामाहीमध्ये टी-डी इन्टरफेस ठिकाणी मिळणा-या एकूण ऊर्जेच्या खरेदीसाठी बेस्टला देयक आकारण्यात येत होते, परंतु २००६-०७ या आर्थिक वर्षाच्या दुस-या सहामाहीमध्ये राज्य भार प्रक्षेपण केंद्राने अंगिकारलेल्या ऊर्जा लेखा पध्दती अनुसार ऊर्जा खरेदीच्या परिमाणाचे देयक आकारण्यात येत आहे. याकरिता बेस्टने या तक्त्यामध्ये सदर आकडेवारी दर्शविली आहे.

## विद्युत ऊर्जा खरेदी :

बेस्ट उपक्रम त्यांच्या वीजग्राहकांची मागणी पूर्ण करण्याकरिता मुख्यत्वेकरुन टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टीपीसीएल) यांच्याकडून ऊर्जा खरेदी करते. बेस्ट उपक्रमासाठी संग्राही व्होल्टता ११० केव्ही आणि २२/३३ केव्ही एवढी आहे. बेस्ट उपक्रमाकडून टाटा पॉवर कंपनी - ऊर्जा निर्मिती यांच्याबरोबर एकूण ऊर्जा निर्मिती क्षमतेपैकी ८०० एमडबल्यूकरिता नवीन ऊर्जा खरेदी कराराबाबत यशस्वी वाटाघाटी केल्या असून अलीकडेच त्याला सन्माननीय आयोगाकडून मान्यता देण्यात आलेली आहे.

## ए) २००६-०७ ते २००८-०९ या वित्तीय वर्षाच्या कालावधीकरिता ऊर्जा खरेदी खर्च.

मेसर्स टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांच्याकडून २००६-०७ या वित्तीय वर्षाच्या पहिल्या सहामाहीमध्ये प्रचलित प्रथेनुसार बेस्ट उपकमाला देयक आकारण्यात येत होते. तद्नंतर, टीपीसीएल यांनी सन्माननीय आयोगाने जारी केलेल्या दिनांक ३ ऑक्टोबर २००६ च्या वीज दरपत्रकानुसार, २००६-०७ या वित्तीय वर्षाकरिताच्या उर्वरित सहा महिन्यांसाठी वीज दरपत्रक आदेशामध्ये विनिर्दिष्टित केलेल्या निदेशाच्या आधारावर देयक आकारणे सुरु केले आहे.

आयोगाने मान्यता दिलेल्या रु. २.७१ दराऐवजी टाटा पॉवर कंपनी ऊर्जा निर्मिती (युनिट ४ वगळून) कडून खरेदी करण्यात येणाऱ्या सरासरी ऊर्जा खरेदी दर रु. २.७७ प्रति युनिट २००७ मधील पहिल्या समहामाहीकरिता होता. (आयोगाचे दि. ३० नोव्हेंबर, २००७ चे सुधारित आदेश). तसेच टीपीसी(जी) च्या युनिट ४ पासून मिळणाऱ्या वीजेचा दर आयोगाने मान्यता दिलेल्या रु. ५.२८ प्रति युनिट ऐवजी चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीकरिता सरासरी ऊर्जा खरेदी दर रु. ६.०६ प्रती युनिट इतका होता. इतर स्त्रोतांपासून मिळणा-या ऊर्जेचा सरासरी ऊर्जा खरेदी दर आयोगाने मान्यता दिलेल्या रु. ४.४१ ऐवजी रु. ५.६१ इतका आहे. विविध ऊर्जा स्त्रोतांमधून बेस्ट उपक्रमास अधिक दराने आकारणी केल्यामुळे आणि वीजग्राहकांच्या अधिक मागणीमुळे बेस्ट उपक्रमाचा ऊर्जा खरेदी खर्च वित्तीय वर्ष २००७-०८ या कालावधीसाठी रु. २१०८.७० कोटी इतका अंदाजित करण्यात आला आहे.

## २००८-२००९ या वित्तीय वर्षाकरिता:

अंदाजित विक्री आणि १०.५ टक्के या प्रमाणे मंजूर केलेली वितरण हानी व ४.८५ टक्के याप्रमाणे पारेषण हानी या आधारे वीजेच्या आवश्यकतेवर बेस्ट उपकमाने २००८-०९ या वित्तीय वर्षाकरिता ५०९६.५५ एमयू एवढी ढोबळ विद्युत ऊर्जा आवश्यकता अंदाजित केली आहे.

या बाबतीमधील आयोगाच्या आदेशानुसार ८०० एमडबल्यूकरिता बेस्ट उपकम आणि टाटा पॉवर कंपनी-ऊर्जा निर्मिती यांच्यामधील ऊर्जा खरेदी करार दिनांक १ एप्रिल २००८ पासून अमंलात येईल. टाटा पॉवर कंपनी-ऊर्जा निर्मिती यांच्याकडून ऊर्जा निर्मिती क्षमतेच्या उच्चतर वितरणाच्या अधीन बेस्ट उपक्रमाने सर्व खरेदीच्या बाबतीतील अंदाज केलेले आहेत.

टाटा पॉवर कंपनी-ऊर्जा निर्मिती संयत्रापासून प्राप्त होणा-या प्रतियुनिट्सचा दर हा आयोगाने टाटा पॉवर कंपनी-ऊर्जा निर्मिती यांच्या बाबतीत दिलेल्या बहुवार्षिक वीजदर आदेशाच्या आधारे असून त्यानुसार रु. २.९६ युनिट एवढा सरासरी बदलता दर आहे. बाह्य स्त्रोतांकडून विद्युत ऊर्जा मिळविण्यासाठी बेस्ट उपक्रमाने केलेल्या अलिकडच्या

कंत्राटानुसार संपूर्ण वर्षाकरिता बाहेरुन खरेदी करण्यात येणाऱ्या युनिटसचा दर रु. ६.०१ एवढा गृहित धरण्यात आलेला आहे.

वीजेची आवश्यकता भागविण्याकरिता नवीकरणक्षम स्त्रोतांकडून एकूण ऊर्जा आवश्यकतेपैकी ५ टक्के वीज खरेदी करण्यासाठी आयोगाने विद्युत पुरवठा वितरण परवानाधारकांना निदेश दिले आहेत. तद्नुसार बेस्ट उपक्रमाने नवीकरणक्षम स्त्रोतांकडून २५४.८३ एमयू एवढे आवश्यक परिमाण अंदाजित केले आहे. बेस्ट उपक्रमाला स्पर्धात्मक बोली प्रकियेद्वारे प्राप्त होणा-या चालू किंमतीच्या आधारावर प्रति युनिट रु. ५ एवढा दर अंदाजित करण्यात आला आहे.

२००८-०९ या वित्तीय वर्षाकरिता, टीपीसी-जी यांना देय असलेले स्थिर आकार, पारेषण आकार आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना देय असणारा राखीव आकार यांची परिगणना पुढे दर्शविण्यात आली आहे.

* मा. आयोगाने टीपीसीजी यांच्या बाबतीत बहुवार्षिक वीज दरपत्रक आदेशाच्या आधारे टीपीसी-जी यांना देय असलेल्या स्थिर खर्चाची परिगणना करण्यात आली आहे. त्यामध्ये औष्णिक संयत्राकरिता (थर्मल प्लान्टस) रु. ५०९ कोटी एवढया स्थिर खर्चाकरिता मान्यता दिली आहे. त्यांच्या स्थापित क्षमतेच्या वाटपाच्या अंदाजे बेस्ट उपक्रमाने ४५% वाटपाचे अंदाज गृहित धरले आहेत.

* मा. आयोगाने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांच्या बाबतीत दिलेल्या बहुवार्षिक वीजदरपत्र आदेशानुसार पारेषण आकाराची परिगणना करण्यात आली आहे. या बाबतीत बेस्ट उपक्रमाला रु. १०३.४७ कोटी एवढे पारेषण आकार लागू करण्यात आले आहेत.

* दिनांक २४ सप्टेंबर २००७ च्या निर्देशांकीत क्षमता आकाराकरिता स. केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने सीईआरसी यांनी अधिसूचीत केलेल्या वाढीव दरानुसार २००७-०८ या वित्तीय वर्षाकरिता देय असलेला राखीव आकार रु. ११४.६३ कोटी एवढया रक्कमेमध्ये ३.५५ टक्के वाढ विचारात घेण्यात आली आहे. अशा प्रकारे बेस्ट उपकमाने अंदाजित केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना देय असलेले राखीव आकार रु. ११८.०५ कोटी एवढे आहेत.

२००७-०८ आणि २००८-०९ या वित्तीय वर्षांकरिता विद्युत ऊर्जा खरेदी खर्चाचे सुधारित अंदाज पुढे दर्शविण्यात आले आहेतः

## २००६-०७, २००७-०८ आणि २००८-०९ ह्या वित्तीय वर्षामधील कालावधीकरिता विद्युत ऊर्जा खरेदीचा खर्च (रू. कोटींमध्ये)

| तपशील | वित्तीय वर्ष २००६-२००७ (प्रत्यक्ष) | वित्तीय वर्ष २००७-२००८ (सुधारित अंदाज) | वित्तीय वर्ष २००८-२००९ (सुधारित अंदाज) |
|---|---|---|---|
| टाटा पॉवर कंपनी-ऊर्जा निर्मिती यांना देय असणारे स्थिर आकार | २३७.११ | १८२.२० | २२९.०१ |
| टाटा पॉवर कंपनी-ऊर्जा निर्मिती यांना देय असणारे ऊर्जा आकार | ९२२.२७ | १२३२.५२ | १२८२.८२ |
| बाह्य खरेदी | १८३.८५ | ३३८.१५ | ३००.८३ |
| टाटा पॉवर कंपनी-ऊर्जा निर्मिती यांना देय असणारे प्रोत्साहन आकार (जल+औष्णिक) | १०.९८ | १०.७२ | ०.०० |
| नवीकरणक्षम ऊर्जा स्त्रोत (आरपीएस) | | | १२७.४१ |
| इंधन समायोजन आकार (एफएसी) | ९.४१ | १२३.७० | |
| मागील वर्षाकरिता इंधन समायोजन आकाराची कमी झालेली वसूली | | ८.०० | |
| एसएलडीसी आकार | | ०.८० | |
| (वजा) हायड्रो पिकींग टॅरिफमुळे वटाव) | (२१.३१) | (२६.६०) | |
| महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना देय असणारे राखीव आकार | ६०.७५ | ११४.६३ | ११८.०५ |
| महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांना देय असणारे आंतरराज्य पारेषण आकार | ५१.१७ | ९७.६१ | १०३.४७ |
| स. आयोगाने सुधारित आदेश जारी केल्यामुळे प्रत्यक्ष स्थिती | | २७.०० | |
| **एकूण (रुपये कोटींमध्ये)** | **१४५४.२३** | **२१०८.७१** | **२१६१.५८** |

बेस्ट उपकमाच्या एकूण वार्षिक महसुली आवश्यकतेपैकी ८० टक्क्यांहून अधिक रक्कम ही विद्युत ऊर्जा खरेदी खर्चाचा भाग आहे आणि म्हणून कोणताही महत्वाचा बदल केल्यास प्रस्तुत संस्थेवर (बेस्ट उपकमावर) त्याचा प्रतिकूल परिणाम होईल. यास्तव, टाटा पॉवर कंपनी-ऊर्जा निर्मिती यांच्या एपीआर बाबतच्या याचिकेला मान्यता देतेवेळी त्याबाबतचा परिणाम बेस्ट उपकमाच्या विद्युत ऊर्जा खरेदी खर्चासंदर्भात विचारात घेण्यात यावा अशी बेस्ट उपकमातर्फे नम्रपणे विनंती करण्यात येत आहे.

**२००६-२००७, २००७-०८ आणि २००८-०९ या वित्तीय वर्षाकरिताच्या विद्युत ऊर्जा खरेदी करण्याबाबतच्या खर्चास मान्यता मिळावी, अशी सन्माननीय आयोगास विनंती करण्यात येत आहे.**

**<u>प्रवर्तन व देखभाल (प्र. व दे.) खर्च :</u>**

प्रवर्तन व देखभाल खर्चामध्ये पुढे नमूद केल्यानुसार, कर्मचारी खर्च, प्रशासकीय व सर्वसाधारण (ए ॲण्ड जी) खर्च व दुरुस्ती आणि देखभाल (आर ऑण्ड एम) खर्च याबाबींचा समावेश आहे :

**२००६-२००७, २००७-२००८ आणि २००८-२००९ या वित्तीय वर्षामधील कालावधीकरिताचा प्रवर्तन व देखभाल खर्च (रु. कोटींमध्ये)**

| तपशील | वित्तीय वर्ष २००६-२००७ | | वित्तीय वर्ष २००७-२००८ | | वित्तीय वर्ष २००८-२००९ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मान्यताप्राप्त | प्रत्यक्ष | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज |
| कर्मचाऱ्यांकरिता खर्च | ११४.६२ | १३८.३८ | ९२.४२ | १३०.९५ | ९५.७५ | १२९.७३ |
| प्रशासन व सर्वसाधारण खर्च | ८२.०० | ९१.७९ | ८६.४ | ९८.४८ | ९१.०४ | १०४.१ |
| दुरूस्ती व देखभाल खर्च | २०.०० | २४.५६ | ५.७३ | १४.४१ | ७.२५ | १६.३२ |
| प्रवर्तन व देखभालकरिताचा एकूण खर्च. | २१६.६२ | २५४.७३ | १८४.५५ | २४३.८४ | १९४.०४ | २५०.१५ |

**पुढे नमूद केलेल्या कारणास्तव प्रवर्तन व देखभाल खर्चामध्ये वाढ झाली आहे :**

* बेस्ट उपकमाकडून सन्माननीय आयोगास नम्रपणे अशी माहिती देण्यात येत आहे की, उपकमाच्या विद्युत पुरवठा उद्योगामध्ये काम करीत असणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता दिनांक ०१.०४.२००६ पासून दिनांक ३१.०३.२००९ पर्यंतच्या कालावधीकरिता बॉम्बे इलेक्ट्रिक वर्कर्स युनियन यांच्यासमवेत दिनांक ०७.११.२००७ रोजी करण्यात आलेला करार आणि बेस्ट समितीचा दिनांक १०.१०.२००७ चा ठराव बृ.स.ठ.क.३४७, अनुसार उपकमातील कर्मचाऱ्यांच्या वेतन तडजोड करारामुळे कर्मचाऱ्यांच्या खर्चामध्ये सर्व तीन वर्षांकरिता वाढ झालेली आहे.

* बेस्ट उपकमाचे बरेचसे वीजग्राहक निवासी प्रवर्गातील आहेत. ज्यांना वीज देयक आकारणीसाठी वीजमापकाचे वाचन दोन महिन्यांतून एकदा करण्यात येत असे. या निवासी प्रवर्गातील ग्राहकांना दरमहा वीजदेयक आकारणी करण्याकरिता सन्माननीय आयोगाने बेस्ट उपक्रमास त्यांच्या दिनांक २६ सप्टेंबर, २००६ रोजीच्या आदेशान्वये दरमहा वीजमापकाचे वाचन करण्याचे निर्देश दिले, याकरिता बेस्ट उपकमास वीजमापकाचे वाचन आणि वीजदेयक स्विकारणे याकरिता मनुष्यबळामध्ये वाढ करणे आवश्यक झाले.

* तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेला देय असणारे केबलचे चर बुजविण्याच्या आकारामध्ये वाढ झाल्यामुळे दुरुस्ती व देखभाल खर्चामध्ये वाढ झाली आहे.

बेस्ट उपक्रमाने २००६-२००७, २००७-२००८ आणि २००८-२००९ या वित्तीय वर्षामधील कालावधीकरिताच्या प्रवर्तन व देखभाल खर्च मान्यतेकरिता नम्रपणे सादर करीत आहे.

**भांडवली व संबंधित खर्च :**

बेस्ट उपक्रम विद्युत पुरवठा वितरण जालव्युहामध्ये वाढ करण्याकरिता मोठी कामे हाती घेत आहे. बेस्ट उपक्रमाच्या वीजग्राहकांना कार्यक्षम व विश्वासार्ह वीजपुरवठा करण्याकरिता बेस्ट उपकमाकडून करण्यात येणारे प्रयत्न हा एक गुंतवणुकीचा भाग आहे.

२००६-२००७ या वर्षापासून २००८-२००९ पर्यंत कालावधीकरिताचा भांडवली खर्च पुढे नमूद करण्यात आला आहे

**२००६-२००७, २००७-२००८ आणि २००८-२००९ या वित्तीय वर्षामधील कालावधीकरिताचा भांडवली खर्च.(रु. कोटींमध्ये)**

| अनु. क्र. | प्रकल्प योजना | वित्तीय वर्ष २००६-०७ (आदेशानुसार) | वित्तीय वर्ष २००६-०७ (प्रत्यक्ष) | वित्तीय वर्ष २००७-०८ (सुधारित अंदाज) | वित्तीय वर्ष २००८-०९ (सुधारित अंदाज) |
|---|---|---|---|---|---|
| १. | नवीन विद्युत संग्राही केंद्र (११० केव्ही एसबीएम आणि ३३-२२/११ केव्ही) | ४२.०९ | २८.९७ | ३८.०० | २७.९० |
| २. | विद्यमान विद्युत संग्राही उपकेंद्रामध्ये वाढ करणे व पुनःस्थापन | १६.७५ | ११.०६ | १४.६५ | १५.१५ |
| ३. | नवीन विद्युत वितरण उपकेंद्र आणि विद्यमान विद्युत उपकेंद्रामध्ये वाढ व फेरफार | २९.५१ | २८.२२ | ५६.३७ | ६१.९२ |
| ४. | विद्युत वितरण जालव्यूहमध्ये वाढ (एचव्ही व एलव्ही तारखंड टाकणे) | ३२.१३ | २१.०९ | ५५.८४ | ५३.४८ |
| ५. | स्काडा, डिजिटायजेशन आणि कम्युनिकेशन | १२.३३ | ३.२२ | ५.८३ | ५.७५ |
| ६. | विद्युत ऊर्जा वीजमापके | २९.१० | १०.७३ | ११९.५१ | ८१.३४ |
| ७. | मार्गप्रकाश (दिवे व तारखंड) | ३.१ | १.४१ | २.६९ | २.७७ |
| ८. | विद्युत ऊर्जा निर्मिती संयंत्र | ०.१५ | | १५.०० | ५.०० |
| ९. | सर्वसाधारण प्रशासनाचा हिस्सा- फर्निचर, कार्यालयीन साधनसामग्री, हत्यारे, स्थापत्य अभियांत्रिकी कामे, मोटार वाहने, इ. | ५.९१ | ४.४८ | १५.५८ | १३.३३ |
| | **एकूण बेरीज :** | **१७१.०७** | **१०९.१८** | **३२३.४८** | **२६६.६४** |

बेस्ट उपक्रम नम्रपणे अशी माहिती देत आहे की, नवीकरणक्षम ऊर्जा खरेदी विनिर्देशाबाबतच्या (आरपीएस) बंधनकारक आवश्यकतांचे पालन करण्याकरिता विद्युत ऊर्जा निर्मिती संयंत्राकरिता अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. ज्यामध्ये पवन आधारित ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा पर्याय अजमाविण्यात येत आहे.

बेस्ट उपक्रमातर्फे भांडवली खर्चाकरिता अंतर्गत निधीतून आणि अंशतः बाहेरील स्त्रोतांकडून कर्ज उभारुन वित्त व्यवस्था करण्यात येते. बेस्ट उपक्रमाने, सार्वजनिक कर्ज, मेगासिटी प्रकल्पाकरिता मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणचे कर्ज, जिल्हा नियोजन विकास परिषद कर्ज आणि गतिमान ऊर्जा विकास व सुधारणा कार्यकमा अंतर्गत कर्ज घेतले आहे.

**घसारा :**

बेस्ट उपक्रमामध्ये वर्षाच्या सुरुवातीस वापरात असणाऱ्या निश्चित स्ट्रेट-लाईन कार्यपध्दती अनुसार घसारा आकारण्यात येतो. कंपन्यांमध्ये अनुसरण्यात येणाऱ्या पध्दतीनुसार बेस्ट उपक्रमाची वित्तीय कार्यपध्दती अवलंबिण्यात येत नाही. म्हणून, नियंत्रण कालावधीकरिता वार्षिक महसुली आवश्यकतांमध्ये घसाऱ्याअंतर्गत कोणत्याही आगाऊ रकमेचा दावा उपक्रम करीत नाही.

२००६-२००७ पासून २००८-२००९ या वित्तीय वर्षामधील कालावधीकरिताच्या घसाऱ्या अंतर्गत रकमा पुढीलप्रमाणे आहेत :-

**२००६-२००७, २००७-२००८ आणि २००८-२००९ या वित्तीय वर्षामधील कालावधीकरिता घसारा (रु. कोटींमध्ये)**

| तपशील | वित्तीय वर्ष २००६-०७ (आदेशानुसार) | वित्तीय वर्ष २००६-०७ (प्रत्यक्ष) | वित्तीय वर्ष २००७-०८ (सुधारित अंदाज) | वित्तीय वर्ष २००८-०९ (सुधारित अंदाज) |
|---|---|---|---|---|
| अंदाजित घसारा (रु.कोटींमध्ये) | ४१.४४ | ३९.९२ | ५४.४५ | ५०.४६ |

**खेळत्या भांडवलावरील व्याज :**

बेस्ट उपक्रम सन्माननीय आयोगास अशी माहिती देत आहे की, २००६-२००७ या वित्तीय वर्षाकरिताचा आदेश आणि २००७-२००८ ते २००९-२०१० या वित्तीय वर्षांमधील तीन वर्षांच्या कालावधीकरिता बहुवार्षिक वीजदरपत्रक आदेश, या आदेशांमध्ये खेळत्या भांडवलावर कोणत्याही स्वरुपातील व्याज मिळण्याकरिता तरतूद नाही. कारण की, उपक्रमाची खेळत्या भांडवलाची गरज अंतर्गत स्त्रोतामधून भागविली जाते. तथापि, वित्तीय वर्ष २००७-०८ आणि २००८-०९ या वर्षाकरिता बेस्ट उपक्रमाने खेळत्या भांडवलावरील व्याज सुधारित केले आहे आणि त्याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत :

**तक्ता क.७ - २००७-२००८ आणि २००८-२००९ या वित्तीय वर्षामधील कालावधीकरिताच्या खेळत्या भांडवलावरील व्याज (रु.कोटींमध्ये)**

| अनु. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष २००७-०८ | | वित्तीय वर्ष २००८-०९ | |
|---|---|---|---|---|---|
| | | आदेश | सुधारित अंदाज | आदेश | सुधारित अंदाज |
| १. | एकूण खेळते भांडवल | | ३५.९५ | | ६८.३३ |
| २. | खेळत्या भांडवलावरील व्याज. (प्रतिवर्षी ११.२५ टक्के यादराने) | ०.०० | ४.०४ | ०.०० | ७.६९ |

बेस्ट उपक्रम सन्माननीय आयोगास अशी नम्रपणे विनंती करीत आहे की, २००७-२००८ या वर्षाकरिता रु.४.०४ कोटी आणि २००८-२००९ या वर्षाकरिता रु.७.६९ कोटी एवढया खेळत्या भांडवलावरील व्याजाच्या सुधारित अंदाजास मान्यता द्यावी.

**वीजग्राहकाच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज :**

२००६ च्या प्रकरण क.३२ च्या संदर्भात सन्माननीय आयोगाने दिनांक ८ नोव्हेंबर २००६ च्या त्यांच्या आदेशान्वये वीजग्राहकांच्या ठेवींवर ६ टक्के या दराने व्याज देण्यास अनुज्ञा दिली आहे. या आदेशामध्ये सन्माननीय आयोगाने २००४-२००५ या वित्तीय वर्षाकरिता रु.१५.६८ कोटी आणि २००५-२००६ या वित्तीय वर्षाकरिता रु.११.७० कोटी एवढया रकमेस मान्यता दिली आहे.

२००६-२००७ या वित्तीय वर्षाकरिता सन्माननीय आयोगाने, वीजदराच्या अटी व शर्ती विनियमांतर्गत देय असल्याप्रमाणे २००६-२००७ या वित्तीय वर्षाकरिता रु.१९४.९२ कोटी एवढया रकमेच्या वीजग्राहकांच्या सुरुवातीच्या ठेवींच्या आधारे रु.११.७० कोटी एवढ्या वीजग्राहक ठेवींवरील व्याजाच्या रकमेस मान्यता दिली होती. तथापि, बेस्ट उपक्रम सन्माननीय आयोगास अशी माहिती देत आहे की, २००६-२००७ या वित्तीय वर्षाच्या अखेरीस वीजग्राहकांच्या सुरक्षा ठेवीच्या रकमेमध्ये रु.२०७.७१ कोटी एवढी वाढ झाली आहे आणि म्हणून, २००६-२००७ या वित्तीय वर्षाकरिता वीजग्राहकांच्या ठेवीवरील व्याजाची रक्कम रु.१२.४६ कोटी एवढी आता सुधारित केली आहे.

सन्माननीय आयोगाने २००७-२००८ आणि २००८-२००९ या वित्तीय वर्षाकरिताच्या बाबतीत प्रत्येक वर्षाकरिता रु.११.७० कोटी एवढी वीजग्राहकांच्या ठेवीवरील व्याजाच्या रकमेस मान्यता दिली आहे. सन्माननीय आयोगाने दिनांक १ एप्रिल २००७ पासून बेस्ट उपक्रमाच्या वीजदरपत्रकाचे पुनरीक्षण केले आहे. बेस्ट उपक्रम सन्माननीय आयोगास अशी माहिती देत आहे की, नवीन वीजदरपत्रकाची अंमलबजावणी केल्यानंतर, बेस्ट उपक्रमाने आपल्या सर्व वीजग्राहकांच्या वीजग्राहक अनामत रक्कम ठेवीं अंदाजित करण्याबाबतची प्रकिया सुरु केली आहे आणि या सुधारित अनामत रकमांबाबत वीजग्राहकांना माहिती देईल. तथापि, बेस्ट उपक्रमाने २००७-२००८ आणि २००८-२००९ या वित्तीय वर्षाकरिता रु.१२.४६ कोटी एवढी वीजग्राहकांच्या अनामत रक्कमेवरील व्याजाची रक्कम सुधारित केली आहे.

## वार्षिक महसुली आवश्यकतांमध्ये दावा केलेल्या परताव्याची रक्कम :

बेस्ट उपक्रम सन्माननीय आयोगास नम्रपणे अशी माहिती देत आहे की, अपील न्यायाधिकरणाने (विद्युत), त्यांच्या दिनांक २७ ऑगस्ट २००७ च्या आदेशान्वये २००४-२००५ या वित्तीय वर्षापासून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम-२००५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे भागभांडवलावरील परताव्यास (रिटर्न ऑन इक्विटी) मान्यता दिली आहे. सन्माननीय आयोगाने २००६ च्या प्रकरण क.३२ च्या बाबतीत दिनांक ८ नोव्हेंबर २००६ च्या त्यांच्या आदेशान्वये भागभांडवलावरील परताव्याच्या (रिटर्न ऑन इक्विटी) ऐवजी ६ टक्के या दराने व्याज आकारण्यास अनुज्ञा दिली आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ मध्ये लागू असल्याप्रमाणे पुढे नमूद केल्यानुसार परतावा आकारण्याचे बेस्ट उपकमाने आता प्रस्तावित केले आहे :

* प्रस्तुत वित्तीय वर्षामध्ये सुरुवातीच्या १०० टक्के विनियामक भांडवलावरील विहित केलेल्या भागभांडवलावरील परतावा (रिटर्न ऑन इक्विटी).

* विद्युत ऊर्जा वितरण व्यवसायामध्ये प्रस्तुत वर्षामधील वाढीव विनियामक भागभांडवलाच्या ५० टक्क्यांवर विहित केलेल्या दरानुसार भागभांडवलावरील अतिरिक्त परतावा. ( ॲडिशनल रिटर्न ऑन इक्विटी)

* विद्युत वितरण व्यवसायामध्ये (मान्यताप्राप्त भांडवली खर्चाच्या आधारे) प्रस्तुत वर्षामधील अंतर्गत निधीवरील अतिरिक्त व्याज.(६ टक्के या दराने)

## भागभांडवलावरील परतावा (रिटर्न ऑन इक्विटी) :

सन्माननीय आयोगाने २००६ च्या प्रकरण क.४ च्या बाबतीत दिनांक ९ मार्च २००६ च्या त्यांच्या आदेशान्वये, २००४-२००५ या वित्तीय वर्षाकरिता रु.९२.९९ कोटी आणि २००५-२००६ या वित्तीय वर्षाकरिता रु.९५.८५ कोटी एवढया रकमेच्या परताव्यास मान्यता दिली होती. त्यावेळी २००४-२००५ या वित्तीय वर्षाकरिता प्रारंभिक भागभांडवल रु.५७०.७२ कोटी गृहित धरण्यात आले होते आणि रु.५९१.६१ कोटी एवढे अखेरचे भागभांडवल होते. बेस्ट उपक्रमाने २००४-२००५ ते २००८-२००९ या वित्तीय वर्षामधील कालावधींकरिता भागभांडवलाच्या परताव्यावरील रकमेवर पुढे नमूद केल्यानुसार दावा केला आहे :

## २००४-२००५ ते २००८-२००९ या वित्तीय वर्षाकरिताच्या भागभांडवलावरील परतावा (रिटन ऑन इक्विटी) (रु. कोटींमध्ये).

| तपशील | वित्तीय वर्ष २००४-०५ | वित्तीय वर्ष २००५-०६ | वित्तीय वर्ष २००६-०७ | वित्तीय वर्ष २००७-०८ | वित्तीय वर्ष २००८-०९ |
|---|---|---|---|---|---|
| प्रस्तुत वर्षाकरिता भागभांडवलावरील परतावा (रिटर्न ऑन इक्विटी) | ९२.९९ | ९५.८५ | ९८.०६ | १०१.३० | १०६.०० |

**अंतर्गत निधीवरील व्याज :**

दिनांक २७ ऑगस्ट २००७ च्या अपील न्यायाधिकरण (विद्युत) च्या आदेशामध्ये बेस्ट उपक्रमाच्या वितरण जालव्युहाकरिता उपक्रमाकडून उपयोगात आणलेला अतिरिक्त अंतर्गत निधीवर व्याज आकारण्याबाबत तरतूद केली आहे. त्यामध्ये पुढील घटक भागांचा समावेश आहे.

* मुभा असलेल्या भांडवली खर्चाच्या प्रमाणकानुसार कर्ज घटक
* भांडवली विस्तार करण्याकरिता बेस्ट उपक्रमाला प्राप्त झालेली अनुदाने

वर नमूद केल्याच्या आधारे २००४-२००५ ते २००८-२००९ या वित्तीय वर्षांमधील कालावधीकरिता ६ टक्के या दराने अंतर्गत निधीवरील व्याज पुढीलप्रमाणे दर्शविण्यात आले आहे :

## २००४-२००५ ते २००८-२००९ या वित्तीय वर्षांमधील कालावधीकरिता अंतर्गत निधीवरील व्याज (रु. कोटींमध्ये)

| तपशील | वित्तीय वर्ष २००४-०५ | वित्तीय वर्ष २००५-०६ | वित्तीय वर्ष २००६-०७ | वित्तीय वर्ष २००७-०८ | वित्तीय वर्ष २००८-०९ |
|---|---|---|---|---|---|
| अनुज्ञेय भांडवली खर्च | ६९.६४ | ४९.७८ | ४२.१६ | ९२.८८ | १०३.०० |
| वर्षाच्या अखेरीस एकत्रित अनुदान | ४५.६३ | ५६.५१ | ८१.५१ | ८१.६३ | |
| अंतर्गत निधींवरील व्याज (६ टक्के दराने) | | | | | |
| प्रमाणकानुसार कर्ज घटक भाग | २.९२ | २.०९ | १.७७ | ३.९० | ४.३३ |
| वर्षाच्या सुरूवातीस शासनाच्या सहाय्यावरील व्याज. | १.६५ | २.७४ | ३.३९ | ४.८९ | ४.९० |
| अंतर्गत निधींवरील व्याज म्हणून परतावा. | ४.५७ | ४.८३ | ५.१६ | ८.७९ | ९.२३ |

वर नमूद करण्यात आलेल्या आधारे वित्तीय वर्ष २००४-२००५ पासून २००६-२००७ पर्यंतच्या कालावधीमध्ये बेस्ट उपक्रमाकडून पुढे नमूद केल्यानुसार परताव्याचा दावा करण्यात येईल :

**२००४-२००५, २००५-२००६ आणि २००६-२००७**
**या वित्तीय वर्षाकरिता परतावा (रु. कोटींमध्ये)**

| तपशील | वित्तीय वर्ष २००४-०५ | | वित्तीय वर्ष २००५-०६ | | वित्तीय वर्ष २००६-०७ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मान्यताप्राप्त | सुधारित दावा | मान्यताप्राप्त | सुधारित दावा | मान्यताप्राप्त | सुधारित दावा |
| अंतर्गत निधींवरील व्याज म्हणून परतावा | ६३.१५ | ४.५७ | ६२.४७ | ४.८३ | ५१.९६ | ५.१६ |
| भागभांडवलावरील परतावा (रिटर्न ऑन इक्विटी) म्हणून परतावा. | | ९२.९९ | | ९५.८५ | | ९८.०६ |

त्याचप्रमाणे वित्तीय वर्ष २००७-२००८ आणि २००८-२००९ करिता बेस्ट उपक्रमाने सुधारित अंदाज म्हणून पुढे नमूद केलेल्या परताव्याची रक्कम प्रस्तावित केली आहे.

**वित्तीय वर्ष २००७-०८ आणि २००८-२००९ करिता**
**परताव्याचे सुधारित अंदाज (रुपये कोटींमध्ये)**

| अनु. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष २००७-०८ | | वित्तीय वर्ष २००८-०९ | |
|---|---|---|---|---|---|
| | | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज | मान्यताप्राप्त | सुधारित अंदाज |
| १. | अंतर्गत निधी.वरील व्याज म्हणून परतावा | ४९.९७ | ८.७९ | ४७.५२ | ९.२२ |
| २. | भागभांडवलावरील परतावा म्हणून (रिटर्न ऑन इक्वटी) | | १०१.३० | | १०६.०० |

वित्तीय वर्ष २००४-२००५ ते २००६-२००७ करिताच्या सुधारित दाव्यांना आणि वित्तीय वर्ष २००७-२००८ व २००८-२००९ करिताच्या सुधारित अंदाजांकरिता मान्यता देण्यासाठी बेस्ट उपक्रम सन्माननीय आयोगास विनम्रपणे विनंती करीत आहे.

## बुडित येणी निर्लेखित करणे :

२००६-२००७ या वित्तीय वर्षाकरिता बुडित कर्जांतर्गत कोणतीही रक्कम निर्लेखित करण्यात आली नाही. तथापि, वित्तीय वर्ष २००७-२००८ व २००८-२००९ करिता पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे :

**वित्तीय वर्ष २००७-२००८ आणि २००८-२००९ करिता निर्लेखित करण्याकरिता अंदाजित केलेले बुडित कर्ज.(रु.कोटींमध्ये)**

